॥ श्री ॥

१४ ब्रह्मानन्दे विद्यानन्द:

-श्रीभारतीतीर्थमुनि या विद्यानंदाख्य चवदाव्या प्रकरणाचा आरंभ करीत असतांना प्रथमत: पूर्वापर ग्रंथाचा संदर्भ सांगतात:-

योगेनात्मविवेकेन द्वैतमिथ्यात्वचिंतया ।
ब्रह्मानन्दं पश्यतोऽथ विद्यानन्दो निरूप्यते ॥१

अन्वयार्थ - [योगेन आत्मविवेकेन द्वैतमिथ्यात्वचिंतया ब्रह्मानन्दं पश्यत: अथ विद्यानन्द: निरूप्यते -] **योग्याच्या योगानें, आत्मविवेकानें व द्वैत मिथ्या आहे अशा चिंतनानें ब्रह्मानंद पाहाणाऱ्या विद्वानाचा विद्यानंद आतां निरूपण केला जात आहे.**

प्रकाश:- अकराव्या प्रकरणांत योगानंद, बाराव्यांत आत्मानंद व तेराव्यांत अद्वैतानंद कसा प्राप्त होतो तें सविस्तर सांगितलें आहे. त्याचें अवलोकन करून ज्या धन्य पुरुषास ब्रह्मानंदाची प्राप्ति झाली आहे, त्यास विद्यानंदाचा लाभ कसा होतो, तें आतां या प्रकरणांत सांगावयाचें आहे. विद्यानंदाचा विषयानंदामध्येंच अंतर्भाव होतो, असें जरी पूर्वीं सांगितलेलें आहे, तरी विषयानंद जसा कीडमुंगीपर्यंत सर्व प्राण्यांस साधारण आहे, तसा हा नाहीं. ज्या पुण्यवानांनीं अश्रांत श्रम करून विद्या संपादन केली असेल त्यांसच याचा लाभ होण्यासारखा असल्यामुळें त्याचें वर्णन निराळ्याच एका प्रकरणांत करावें, असें ग्रंथकारास वाटलें. व त्याकरितां ह्या प्रकरणाचा आरंभ झाला आहे. ॥१॥

- आतां विद्यानंदाचें स्वरूप व त्याचे अवांतर भेद सांगतात:-

विषयानन्दवद्विद्यानन्दो धीवृत्तिरूपक: ।
दु:खाभावादिरूपेण प्रोक्त एष चतुर्विध: ॥२

अन्वयार्थ - [विषयानंदवत् विद्यानंद: धीवृत्तिरूपक: एष: दु:खाभावादिरूपेण प्रोक्त:-] **विषयानंदाप्रमाणें हा विद्यानंद बुद्धिवृत्तिरूप आहे; हा दु:खाचा अभाव इत्यादिरूपानें चार प्रकारचा सांगितलेला आहे.**

प्रकाश:- विद्यानंद विद्येमुळें प्राप्त होत असतो. अर्थात् तो चित्तवृत्तिरूप आहे व त्या वृत्तीचा विद्या हा विषय असल्यामुळें तज्जन्य आनंदहि विषयानंद होय. त्याचे चार भेद आहेत व त्या सर्वांचा विचार पुढच्या श्लोकातच होणार आहे. ॥२॥

दु:खाभावश्च कामाप्ति: कृतकृत्योहमित्यसौ ।
प्राप्तप्राप्योहमित्येव चातुर्विध्यमुदाहृतम् ॥३

अन्वयार्थ - [दु:खाभाव: कामाप्ति: कृतकृत्य: अहं इति असौ प्राप्तप्राप्य: अहं इति एव चातुर्विध्यं उदाहृतं अस्ति-] **दु:खाचा अभाव, इष्टप्राप्ति, मी कृतकृत्य आहें अशीं भावना व सर्व प्राप्तव्य मला प्राप्त झालें आहे असा निश्चय, असे त्याचे चार प्रकार सांगितलेले आहेत.**

प्रकाश:- दु:खाची कांहीं काल होणारी निवृत्ति सुखद असते. त्याचप्रमाणें इष्ट पदार्थांचा लाभ झाला असतांहि सुख होतें. मी कृतकृत्य झालों आहें, मला आतां कर्तव्य असें कांही एक उरलेलें नाहीं, अशी मनाची भावना झाली असतांहि शांतिरूप सुख प्राप्त होत असतें. तसेंच मला जें जें कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें होतें तें तें सर्व प्राप्त झालें आहे, असा निश्चय झाल्यावरहि प्राणी सर्व कर्मांपासून निवृत्त होतो व

त्यामुळें त्यास परम सुख होतें. पण हे सर्व आनंद वृत्तिरूप आहेत. यास्तव त्यांची विषयानंदामध्येंच गणना करावी. सारांश, याप्रमाणें विषयानंद चार प्रकारचा आहे. ॥३॥

- पूर्वोक्त चार प्रकारांत दुःखाभाव हा प्रथम आनंद होय. यास्तव त्याचें वर्णन करण्याकरितां प्रथमतः दुःखाचे भेद किती आहेत व त्यांतील कोणतें दुःख निवृत्त होण्यासारखें आहे, तें सांगतात -

ऐहिकं चामुष्मिकं चेत्येवं दुःखं द्विधेरितम् ।
निवृत्तिमैहिकस्याह बृहदारण्यकं वचः ॥४

अन्वयार्थ - [ऐहिकं च आमुष्मिकं च इति एवं दुःखं द्विधा ईरितं अस्ति-] इहलोकचें व परलोकचें असें दुःख दोन प्रकारचें सांगितलेलें आहे. **[बृहदारण्यकं वचः ऐहिकस्य निवृत्तिं आह-]** बृहदारण्यकाचें वाक्य ऐहिक दुःखाची निवृत्ति सांगतें.

प्रकाशः- या श्लोकांतील ऐहिक, आमुष्मिक इत्यादि पदांचा अर्थ पुढें मूळ ग्रंथांतच स्पष्ट होणार आहे. ॥४॥

- तें बृहदारण्यकवाक्य पढतात -

आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः ।
किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनु संज्वरेत् ॥५

अन्वयार्थ - [पूरुषः आत्मानं अयं अस्मि इति विजानीयात् चेत्-] पुरुष आत्म्याला 'हा मी आहें' असें जर जाणील, तर मग **[किं इच्छन् कस्य कामाय शरीरं अनु संज्वरेत्-]** कशाच्या इच्छेनें व कोणाच्या कामाकरितां शरीराबरोबर संतप्त होईल ?

प्रकाशः- या श्रुतिवचनाचें व्याख्यान मागें सातव्या प्रकरणांत विस्तृतपणें होऊन गेलें आहे. ॥५॥

-आतां आत्म्याचे ठिकाणीं शोकसंबंध दाखविण्यासाठीं त्याचा भेद सांगतात -

जीवात्मा परमात्मा चेत्यात्मा द्विविध ईरितः ।
चित्तादात्म्यात्त्रिभिर्देहैर्जीवः सन् भोक्तृतां व्रजेत् ॥६

अन्वयार्थ - [जीवात्मा च परमात्मा इति आत्मा द्विविधः ईरितः अस्ति-] जीवात्मा व परमात्मा असा आत्मा दोन प्रकारचा सांगितलेला आहे. **[त्रिभिः देहैः चित्तादात्म्यात् जीवः सन् भोक्तृतां व्रजेत्-]** स्थूलादि तीन देहांशीं चैतन्याचें तादात्म्य झाल्यामुळें तें चैतन्यच जीव होत्सातें भोक्तृत्वास प्राप्त होतें.

प्रकाशः- पूर्वीं तृप्तिदीपांत प्रस्तुत प्रकरण जरी विस्तारपूर्वक होऊन गेलें आहे तरी विषयसंदर्भ समजण्याकरितां ग्रंथकारांनीं येथें त्याचें संक्षेपतः वर्णन केलें आहे. स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहांशीं भ्रमानें चैतन्याचें तादात्म्य केलें असतां तें चैतन्य भोक्ता होतें. भोक्ता होणें म्हणजे जीव होणेंच आहे. तात्पर्य जड पदार्थांशीं चैतन्याचें ऐक्य केल्यानें शुद्ध चैतन्य, जीव, भोक्ता, संसारी इत्यादि रूप होतें. ॥६॥

परमात्म्याचें स्वरूप -

परात्मा सच्चिदानन्दस्तादात्म्यं नामरूपयोः ।
गत्वा भोग्यत्वमापन्नस्तद्विवेके तु नोभयम् ॥७

अन्वयार्थ - [परात्मा सच्चिदानंदः-] परमात्मा सच्चिदानंदरूप आहे. त्याला भोग्यत्व कसें प्राप्त होतें तें सांगतात - **[नामरूपयोः तादात्म्यं गत्वा भोग्यत्वं आपन्नः-]** नाम व रूप यांच्या कल्पनेचें अधिष्ठान या रूपानें त्यांच्याशीं तादात्म्य पावून तो भोग्यत्वाला प्राप्त होतें. त्याच्या वास्तविक भोक्तृत्वादिकांच्या अभावाचें कारण - **[तद्विवेके तु उभयं न अस्ति-]** स्थूलादि तीन शरीरें व जगत् यांहून तो अगदीं भिन्न आहे, असें विवेकज्ञान झालें असतां त्याला भोक्तृभोग्यरूपत्व नाहीं.

प्रकाशः- परमात्मा जरी सच्चिदानंदरूप आहे, तरी नामरूपात्मक द्वैताशीं ऐक्य पावला असतां तो भोग्य होतो. पण मुमुक्षूस तें चैतन्य स्थूलादि तीन शरीरें व सृष्टि यांहून अगदीं भिन्न व विलक्षण आहे, असें विवेकद्वारा समजलें असतां त्याच्या दृष्टीनें तें भोक्ताहि

नसतें व भोग्यहि नसतें. ।।७।।

- उक्तार्थाचेंच विवरण -

भोग्यमिच्छन् भोक्तुरर्थे शरीरमनु संज्वरेत् ।
ज्वरास्त्रिषु शरीरेषु स्थिता न त्वात्मनो ज्वरा: ।।८

अन्वयार्थ - [भोक्तु: अर्थे भोग्यं इच्छन् शरीरं अनु संज्वरेत्-] भोक्त्याकरितां भोग्याची इच्छा करणारा पुरुष शरीराबरोबर संतप्त होतो. [ज्वरा: त्रिषु शरीरेषु स्थिता:-] संताप तीन शरीरांमध्ये असतात. [तु ज्वरा: आत्मन: न सन्ति-] पण ते आत्म्याला नाहींत.

प्रकाश- मला अमुक अमुक विषय प्राप्त व्हावे असें ज्याला वाटत असतें, त्यालाच शरीराच्या पीडेनें पीडा होते. पीडा शरीरास होत असते. तिचा आत्म्याशीं कांहींएक संबंध नाहीं, कारण तो असंग आहे. ।।८।।

-आतां त्रिविध शरीरांतील कोणत्या शरीरांत कोणता ज्वर राहतो, तें सांगतात -

व्याधयो धातुवैषम्ये स्थूलदेहे स्थिता ज्वरा: ।
कामक्रोधादय: सूक्ष्मे द्वयोर्बीजं तु कारणे ।।९

अन्वयार्थ - [धातुवैषम्ये ये व्याधय: ते स्थूलदेहे स्थिता: ज्वरा: सन्ति-] कफादि धातूंचे वैषम्य झालें असतां जे व्याधि रोग होतात, ते स्थूल देहांत राहणारे ज्वर आहेत. सूक्ष्म व कारण शरीरांतील ज्वर [कामक्रोधादय: सूक्ष्मे स्थिता:-] कामक्रोधादिक सूक्ष्म देहांत असतात. [द्वयो: बीजं तु कारणे स्थितम्-] व त्या दोहोंचेंहि बीज कारणामध्यें राहतें.

प्रकाश:- कफ, वात व पित्त हे तीन धातू जोंपर्यंत साम्यावस्थेंत असतात, तोंपर्यंत ते शरीराचें उत्तम प्रकारें धारण करितात. पण त्यांच्यामध्यें न्यूनाधिक भाव आला कीं अनेक व्याधि उत्पन्न होतात. पण त्या सर्व स्थूल देहगत असतात. काम, क्रोध, इत्यादि मानसिक व्यथा आहेत व त्या सूक्ष्म शरीरांत असतात; आणि या दोन्हीं पीडांचें बीज कारणशरीरांत असतें. ।।९।।

- वरील श्रुतिवाक्याचें तात्पर्य सांगण्याच्या मिषान पूर्वोक्त अर्थच विशद करितात -

अद्वैतानन्दमार्गेण परात्मनि विवेचिते ।
अपश्यन्वास्तवं भोग्यं किं नामेच्छेत्परात्मवित् ।।१०

अन्वयार्थ - [अद्वैतानंदमार्गेण परात्मनि विवेचिते सति-] तिसऱ्या अध्यायांत सांगितलेल्या अद्वैतानंदाच्या द्वारा मायाकार्यभूत नाम-रूपाहून सच्चिदानंद परमात्म्याचें विवेचन झालें असतां - त्याचें भेदज्ञान झालें असतां [वास्तवं भोग्यं अपश्यन् परात्मवित् किं नाम इच्छेत्-] प्रपंच मिथ्या आहे अशा निश्चयानें वास्तविक भोग्य न पाहणारा परमात्मवेत्ता कशाची इच्छा करणार ?

प्रकाश:- एक व अद्वितीय अशा आत्म्याच्या स्वरूपभूत आनंदाच्या द्वारा ज्यानें परमात्म्याचें स्वरूप या जड सृष्टीहून अगदीं विलक्षण आहे असें जाणलें आहे, त्यास या सृष्टींतील एकहि पदार्थ सत्य भासत नाही. तेव्हां तो त्याच्याविषयीं इच्छा कशी करणार ? स्वप्नातील द्रव्याची किंवा गारुडयानें केलेल्या रुपयाची कधीं कोणी इच्छा करीत नाहीं. ।।१०।।

-पूर्वाध्यायांत सांगितल्याप्रमाणें जीवात्म्याच्या असंग कूटस्थ चैतन्यरूपाचा निश्चय झाला असतां कामना करणाराच उरत नसल्यामुळें ज्वरादिकांचा संबंध नाहीं, असें सांगतात -

आत्मानन्दोक्तरीत्यास्मिन् जीवात्मन्यवधारिते ।
भोक्ता नैवास्ति कोऽप्यत्र शरीरे तु ज्वर: कुत: ।।११

अन्वयार्थ - [आत्मानंदोक्तरीत्या अस्मिन् जीवात्मनि अवधारिते सति-] आत्मानंदनामक अध्यायांत सांगितल्याप्रमाणें या जीवात्म्याविषयीं निश्चय झाला असतां [अत्र क: अपि भोक्ता न अस्ति एव-] या शरीरेंद्रियसमूहांत भोक्ता कोणीहि नसतो;

[शरीरे तु ज्वर: कुत:-] मग शरीरांत ज्वर-दु:ख कोठून असणार !

प्रकाश:- जीवात्मा वस्तुत: कूटस्थ, असंग व चैतन्यरूप आहे असें निश्चयपूर्वक समजलें असतां कामना करणारा भोक्ताच राहत नाहीं. मग शरीरांत राहणाऱ्या व्याधींचा आत्म्याशीं संबंध कसा होणार ? सारांश, ऐहिक दु:खाचा आत्म्याशीं कांहीं एक संबंध नाहीं. ॥११॥

- आतां पारलौकिक संताप कोणता तें सांगतात -

पुण्यपापद्वये चिंता दु:खमामुष्मिकं भवेत् ।
प्रथमाध्याय एवोक्तं चिंता नैनं तपेदिति ॥१२

अन्वयार्थ - [पुण्यपापद्वये या चिंता तत् एव आमुष्मिकं दु:खं भवेत्-] पुण्य व पाप या दोन्हीविषयीं जी चिंता तेंच पारलौकिक दु:ख होय [एनं चिंता न तपेत् इति प्रथमाध्याये एव उक्तम् -] 'या पुरुषाला चिंता संतप्त करीत नाहीं' असें प्रथमाध्यायांतच सांगितलें आहे.

प्रकाश:- 'अरेरे, मीं पुण्य केलें नाहीं, पापाचें मात्र अनुष्ठान केलें' असें प्राण्यास अंतकालीं दु:ख होत असतें. तेंच पारलौकिक दु:ख होय. कारण परलोकांतील दु:खास ही चिंताच कारण होत असते. 'ज्ञानी पुरुषास प्रस्तुत चिंता संतप्त करीत नाहीं' इत्यादि अकराव्या प्रकरणाच्या श्लोकांत सांगितलें आहे. ॥१२॥

-ज्ञान्याला क्रियमाणकर्मामुळेंहि संताप होत नाहीं, असे आतां 'तद्यथा पुष्करपलाशे०' या- छां. ४.१४. ३-श्रुतीच्या आधारानेंच सांगतात -

यथा पुष्करपर्णेऽस्मिन्नपामश्लेषणं तथा ।
वेदनादूर्ध्वमागामिकर्मणोऽश्लेषणं बुधे ॥१३

अन्वयार्थ - [यथा अस्मिन् पुष्करपर्णे अपां अश्लेषणं-] ज्याप्रमाणें या कमलपत्राचे ठिकाणीं उदकाचा संपर्क होत नाहीं, [तथा बुधे वेदनात् ऊर्ध्वं आगामिकर्मण: अश्लेषणं भवति-] त्याप्रमाणें ज्ञान्याचे ठिकाणीं साक्षात्कारानंतर क्रियमाण कर्माचा संपर्क होत नाहीं.

प्रकाश:- कमलाची पाकळी पाण्यामध्यें एक प्रहरभर जरी ठेविली, तरी त्याचा तिला लेप होत नाहीं. पाकळी वर काढतांच ती कोरडी ठणठणीत आहे, असेंच दिसतें. त्याचप्रमाणें ज्ञानी पुरुषास आत्मसक्षात्कारानंतर घडणाऱ्या क्रियमाण कर्मांचा संपर्क होत नाहीं. एवढ्याकरितांच भगवानांनीं 'ज्ञानाग्नि सर्व कर्मे भस्मरूप करून सोडतो' असें म्हटलें आहे. ॥१३॥

-संचितकर्मेहि ज्ञानास प्रतिबंध करीत नाहीं, असें आतां 'तद्यथेषीकातूलमग्नौ प्रोतं०' - छां. ५.२४. ३.- या श्रुतीच्या आधारानें सांगतात -

इषीकातृणतूलस्य वह्निदाह: क्षणाद्यथा ।
तथा संचितकर्मास्य दग्धं भवति वेदनात् ॥१४

अन्वयार्थ - [यथा इषीकातृणतूलस्य क्षणात् वह्निदाह:-] ज्याप्रमाणें इषीका-गवताची बारीक काडी, कापूस, वगैरे अग्नीमध्यें टाकलीं असतां एका क्षणांत जळून जातात [तथा अस्य संचितकर्म वेदनात् दग्धं भवति-] त्याप्रमाणें ज्ञान्याचें संचित कर्म ज्ञानामुळें दग्ध होतें.

प्रकाश:- 'ज्याप्रमाणें गवताची बारिक काडी पेटलेल्या अग्नींत घातली असतां तात्काल जळून भस्म होते; त्याप्रमाणें ज्ञानी पुरुषाचें पाप नष्ट होतें' अशी श्रुति आहे व तिच्यावरून ज्ञानी पुरुषाचें संचित कर्महि नष्ट होतें, असें ठरतें. अर्थात् संचित कर्माविषयींहि ज्ञान्यास चिंता करण्याचें कारण नाहीं. ॥१४॥

- याविषयीं भगवद्गीतावाक्याचेंहि प्रमाण देतात

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥१५

अन्वयार्थ - [हे अर्जुन, यथा समिद्धः अग्निः एधांसि भस्मसात् कुरुते-] हे पार्था, ज्याप्रमाणें पेटलेला अग्नि काष्ठांस भस्म करून सोडतो, [तथा ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते-] त्याप्रमाणें ज्ञानरूपी अग्नि प्रारब्धातिरिक्त सर्व कर्मांस भस्म करितो.

प्रकाशः- प्रदीप्त अग्नि असंख्य काष्ठांस हां हां म्हणतां भस्म करून टाकतो हें सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यामुळेंच एकाद्या ठिकाणीं आग लागली असतां लक्षावधि रुपयांची हानि होत असल्याचें ऐकिवांत येतें. आत्मसाक्षात्काररूपी अग्नीहि असाच प्रबल आहे. कारण तो सुद्धा सर्व संचित कर्मांचा तात्काल नाश करीत असतो. ॥१५॥

-आतां गीतेच्या अठराव्या अध्यायांतील आणखी एका वाक्याचें प्रमाण देतात -

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमाल्ँलोकान्न हंति न निबध्यते ॥१६

अन्वयार्थ - [यस्य अहंकृतः भावः न च यस्य बुद्धिः न लिप्यते-] ज्याला अहंकार नसतो व ज्याची बुद्धि लिप्त होत नाहीं, [सः इमान् लोकान् हत्वा अपि न हंति च न निबध्यते-] तो या लोकांना मारूनहि हनन करीत नाहीं व बद्ध केला जात नाहीं.

प्रकाशः- ज्यानें पुण्याचरणानें विवेकास प्रतिबंध करणाऱ्या पापांचा नाश केला आहे, जो साधनचतुष्टयसंपन्न झाला आहे, ज्याला शास्त्र व आचार्य यांच्या उपदेशानें अकर्ता, अभोक्ता, स्वयंप्रकाश, चिदानंदमय व नित्य अशा आत्म्याचें साक्षात् ज्ञान झालें आहे, आणि ज्याच्या अज्ञानाची निवृत्ति झाली आहे, त्याला 'मी कर्ता आहें' असा अहंकार कधींहि होत नाहीं. त्यामुळें त्याची बुद्धीहि पापपुण्यानें लिप्त होत नाहीं. ही स्थिति ज्याला प्राप्त झाली आहे, त्यानें या सृष्टींतील सर्व प्राण्यांची जरी हिंसा केली, तरी तो तिचा कर्ता होत नाहीं. व त्यामुळें तो तज्जन्य पापानें बद्ध होत नाहीं. ॥१६॥

-आतां प्रस्तुत अर्थींच 'न मातृवधेन न पितृवधेन न स्तेयेन' इत्यादि कौषीतकीवाक्याचा अर्थतः निर्देश करितात -

मातापित्रोर्वधस्तेयं भ्रूणहत्यान्यदीदृशम् ।
न मुक्तिं नाशयेत्पापं मुखकांतिर्न नश्यति ॥१७

अन्वयार्थ - [मातापित्रोः वधः स्तेयं भ्रूणहत्या च ईदृशं अन्यत् पापं मुक्तिं न नाशयेत्-] माता पिता यांचा वध, चोरी, भ्रूणहत्या व अशाच प्रकारचें दुसरेंहि पाप मुक्तीला नष्ट करीत नाहीं [च मुखकांतिः न नश्यति-] व मुखावरील कांतिहि जात नाहीं.

प्रकाशः- ज्ञानी पुरुषाच्या हातून मातृवधासारखीं महापातकें घडलीं असलीं, तरी त्याच्या मुक्तीस बाध येत नाहीं. व त्याच्या मुखावरील हर्षहि कमी होत नाहीं. असा याचा भावार्थ समजावा. ॥१७॥

-ह्याप्रमाणें दुःखाभावरूप आनंदाचें निरूपण करून आतां कामावाप्तिरूप दुसऱ्या विद्यानंदाचें विवेचन करितात -

दुःखाभाववदेवास्य सर्वकामाप्तिरीरिता ।
सर्वान्कामानसावाप्त्वा ह्यमृतोऽभवदित्यतः॥१८

अन्वयार्थ - [असौ सर्वान् कामान् आप्त्वा हि अमृतः अभवत्-] हा सर्व कामांना प्राप्त करून घेऊनच अमृत झाला, [इति अतः दुःखाभाववत् एव अस्य कामावाप्तिः ईरिता-] इत्यादि ऐतरेय- ऐ. भा. ४ श्रुतिवचनानें दुःखाच्या अभावाप्रमाणेंच त्याला कामाची प्राप्ति सांगितलेली आहे.

प्रकाशः- ऐतरेयोपनिषदामध्यें प्रस्तुत अर्थाचें वाक्य आहे. त्याचा - हा साधक सर्व कामना पूर्ण झाल्यावर अमर होतो - असा भावार्थ आहे. सारांश, दुःखाच्या अभावाप्रमाणेंच कामप्राप्तिहि सांगितलेली आहे. ॥१८॥

- आतां 'जक्षन् क्रीडन् रममाण:०' इत्यादि छान्दोग्यश्रुति अर्थत: पढतात -

जक्षन्क्रीडन्रतिं प्राप्त: स्त्रीभिर्यानैस्तथेतरै: ।
शरीरं न स्मरेत्प्राण: कर्मणा जीवयेदमुम् ॥१९

अन्वयार्थ - [जक्षन्, क्रीडन्, स्त्रीभि: यानै: तथा इतरै: रतिं प्राप्त: शरीरं न स्मरेत्-] खात, खेळत, स्त्रिया, वाहनें व त्याचप्रमाणें दुसरे ज्ञानी, अज्ञानी, मित्र, इत्यादिकांसह करमणूक करीत होत्साता ज्ञानी शरीराला आठवीत नाहीं. त्याला शरीराचें स्मरण नसतें. [प्राण: कर्मणा अमुं जीवयेत्-] प्राण प्रारब्ध कर्माच्या योगानें त्यास वांचवितो.

प्रकाश:- सर्वत्र आत्माच भरलेला आहे असें पाहणाऱ्या ज्ञान्यास दु:ख होत नाहीं. तो सर्वदा अनेक सुखांचा अनुभव घेत असतो. छान्दोग्यांत त्याच्या सुखोपभोगाचें वर्णन येणेप्रमाणें केलें आहे. - आत्मज्ञ इंद्र, राजा इत्यादिकांच्या शरीरांत अनेक खाद्यपेयादि पदार्थ खात, बालकें, स्त्रिया, आप्त यांसह खेळत व हंसत, वाहनांत बसून व फिरत व सजातीयांशीं आनंद करीत असतो. त्याला अगदीं जवळ असलेल्या या शरीराचेंहि भान नसतें. ज्ञानाच्या पूर्वीं देहतादात्म्यामुळें त्यास जसें पदोपदीं दु:ख होत होतें, तसें ज्ञानानें तो भ्रम नष्ट झाल्यावर होत नाहीं. सारांश, सर्वहि आनंद ब्रह्मानंदाचे लेश असल्यामुळें तत्त्वज्ञ पुरुष त्यांच्याविषयीं मनामध्यें प्रेम बाळगतो व दु:खाचा माझ्याशीं कांहीं संबंध नाहीं. असें समजतो. ॥१९॥

- आतां 'सोऽश्नुते सर्वान् कामान्सह' ही तैत्तिरीय श्रुति अर्थत: येथें घेतात -

सर्वान्कामान्सहाप्नोति नान्यवज्जन्मकर्मभि: ।
वर्तन्ते श्रोत्रिये भोगा युगपत् क्रमवर्जिता: ॥२०

अन्वयार्थ - [सर्वान् कामान् सह आप्नोति अन्यवत् जन्मकर्मभि: न-] ज्ञान्याला सर्व काम एकदम प्राप्त होतात, पण तें अज्ञांप्रमाणें जन्म व कर्म यांच्या योगानें प्राप्त होत नाहींत, कारण ज्ञानानें त्याच्या संचित कर्माचा दाह झालेला असतो. [श्रोत्रिये भोगा: युगपत् क्रमवर्जिता: वर्तन्ते-] श्रोत्रियामध्यें सर्व भोग एकाच कालीं क्रम सोडून राहतात.

प्रकाश:- ज्याला आत्मसाक्षात्कार झालेला असतो त्यास सर्व विषय एकदम प्राप्त होतात, व त्यांच्या भोगाकरितां त्यास जन्म घेऊन शरीरयुक्त व्हावें लागत नाहीं. कर्माच्या अधीन होऊन राहणाऱ्या प्राण्यास एकामागून एक अशा क्रमानें भोग मिळतात. पण ज्ञानी श्रोत्रियास ते सर्व एकच कालीं प्राप्त होतात. ॥२०॥

-तैत्रिरीय व बृहदारण्यक उपनिषदांतील आनंदप्रतिपादक वाक्य अर्थत: पढतात -

युवा रूपी च विद्यावान्नीरोगी दृढचित्तवान् ।
सैन्योपेत: सर्वपृथ्वीं वित्तपूर्णां प्रपालयन् ॥२१
सर्वैर्मानुष्यकैर्भोगै: संपन्नस्तृप्तभूमिप: ।
यमानन्दमवाप्नोति ब्रह्मविच्च तमश्नुते ॥२२

अन्वयार्थ - [युवा रूपी च विद्यावान् नीरोगी दृढचित्तवान् सैन्योपेत: वित्तपूर्णां सर्वपृथ्वीं प्रपालयन् सर्वै: मानुष्यकै: भोगै: संपन्न: तृप्तभूमिप:-] तरुण, रुपवान्, विद्वान्, नीरोगी, निश्चयी, सैन्ययुक्त, धनानें भरलेल्या सर्व पृथ्वीचें पालन करणारा व सर्व मानुषलोकाच्या भोगांनीं संपन्न असा तृप्त राजा [यं आनन्दं अवाप्नोति तं ब्रह्मवित् च अश्नुते-] ज्या आनंदास प्राप्त होतो, त्याचा ब्रह्मवेत्ताहि उपभोग घेतो.

प्रकाश:- तारुण्यादि गुणांनीं युक्त असलेल्या सार्वभौम राजाचें सुख ब्रह्मवेत्त्या पुरुषासहि मिळतें. म्हणजे त्या दोघांचेंहि सुख सारखेंच असतें. मूळ श्रुतीमध्यें श्रोत्रियास अकामहत हें विशेषण दिलें आहे. सारांश-निष्काम श्रोत्रियाचा आनंद पूर्वोक्त राजाच्या आनंदाबरोबर असतो. ॥२१॥२२॥

-'पण सार्वभौम व विद्वान् यांची विषयप्राप्ति एकसारखीच नसतांना त्यांचा आनंद एकसारखाच कसा असतो ?' अशी आशंका घेऊन दोघांनाहि त्या विषयींची निरपेक्षता एकसारखीच असल्यामुळें त्यांची तृप्तिहि समान असते, असें उत्तर -

मर्त्यभोगे द्वयोर्नास्ति कामस्तृप्तिरत: समा ।
भोगन्निष्कामतैकस्य परस्यापि विवेकत: ।।२३

अन्वयार्थ - [मर्त्यभोगे द्वयो: काम: नास्ति अत: तृप्ति: समा-] मृत्युलोकांतील भोगांविषयीं दोघांनाहि इच्छा नसते. त्यामुळें त्यांची तृप्ति सारखीच असते [एकस्य भोगात् निष्कामता परस्य अपि विवेकत:-] कारण एकाची भोगामुळें निष्कामता व दुसऱ्याची विवेकामुळें.

प्रकाश:- ऐहिक भोगांविषयीं पूर्वोक्त प्रकारचा राजा व निष्काम यति हे दोन्ही नि:स्पृह असतात. कारण राजा अनेक भोग भोगून तृप्त झालेला असतो व यति विषयांच्या स्वरूपाचें विवेचन करून ते निस्तत्त्व आहेत असें समजल्यामुळें तृप्त होतो. मिळून दोघांचीहि तृप्ति सारखीच. ।।२३।।

-मैत्रायणीय श्रुतीच्या आधारें दोष दाखवितात -

श्रोत्रियत्वाद्वेदशास्त्रैर्भोगदोषानवेक्षते ।
राजा बृहद्रथो दोषांस्तान् गाथाभिरुदाहरत् ।।२४

अन्वयार्थ - [यति: श्रोत्रियत्वात् वेदशास्त्रै: भोगदोषान् अवेक्षते-] यति श्रोत्रियपणामुळें वेद व शास्त्रें यांच्या योगानें भोगांतील दोषांस पाहतो. [राजा बृहद्रथ: तान् दोषान् गाथाभि: उदाहरत्-] राजा बृहद्रथ त्या दोषांस मैत्रायणीयशाखेंत गाथारूपानें सांगता झाला.

प्रकाश:- जन्म, संस्कार व विद्या यांच्या योगानें ब्राह्मण श्रोत्रिय होतो. अर्थात् त्याच्या अंगांत सदसद्विवेकसामर्थ्य असतें. त्यामुळें तो वेद व शास्त्रें यांच्या द्वारा भोगांतील दोषांचें निरीक्षण करितो. मैत्रायणीय श्रुतीमध्यें राजा बृहद्रथानें गाथारूपानें दाखविलेलें विषयदोषांचें वर्णन आहे. ।।२४।।

- त्या दोषांचा निर्देश -

देहदोषांश्चित्तदोषान् भोग्यदोषाननेकश: ।
शुना वांते पायसे नो कामस्तद्वद्विवेकिन: ।।२५

अन्वयार्थ - [स: देहदोषान् चित्तदोषान् च अनेकश: भोग्यदोषान् उदाहरत्-] तो राजा देहदोष, चित्तदोष व अनेक प्रकारचें विषयदोष दाखविता झाला. विवेक्याच्या मनांत कामांचा उदय होत नाहीं, याविषयीं आणखी दृष्टान्त- [यथा शुना वांते पायते काम: नो अस्ति तद्वत् विवेकिन:-] ज्याप्रमाणें कुत्र्यानें वमन केलेल्या खिरीवर कोणाची वांछा जात नाहीं, त्याप्रमाणें विवेक्याची विषयांवर वांछा जात नाहीं.

प्रकाश:- देह कफवातपित्तयुक्त आहे, तो आध्यात्मिक पीडेनें ग्रासलेला असतो, दु:खाचें मूळ तोच आहे. इत्यादि देहदोष, मन चंचल आहे, तें उगीच कांहीं तरी संकल्प करणारें आहे, त्याच्यामध्यें क्षणोक्षणीं विलक्षण वृत्ती उठत असतात इत्यादि चित्तदोष; व विषय अनर्थांत पडणारे आहेत, ते क्षणिक आहेत, इत्यादि विषयदोष होत. अशा रीतीनें पूर्वोक्त श्रुतींत सविस्तर वर्णन आहे. असो; कुत्र्यानें ओकून ठेवलेल्या दुधाच्या खिरीवर जशी कोणाची वांछा जात नाहीं. त्याचप्रमाणें या ज्ञानी पुरुषांचीहि अशा अनेक दोषयुक्त विषयांवर इच्छा जात नाहीं. तो विषयांस काकविष्टेप्रमाणें किंवा कुत्र्याच्या ओकीप्रमाणें समजतो. ।।२५।।

- सार्वभौम राजापेक्षा श्रोत्रियाचें आधिक्य-

निष्कामत्वे समेऽप्यत्र राज्ञ: साधनसंचये ।
दु:खमासीद्भाविनाशादतिभीरनुवर्तते ।।२६
नोभयं श्रोत्रियस्यातस्तदानन्दोऽधिकोऽन्यत: ।
गंधर्वानंद आशास्ति राज्ञो नास्ति विवेकिन: ।।२७

अन्वयार्थ - [निष्कामत्वे समे अपि-] निष्कामत्व जरी एकसारखेंच असलें, तरी [अत्र राज्ञ:

साधनसंचये दु:खं आसीत्-] त्यापैकीं राजाला साधनांचा संचय करितांना दु:ख झालेलें असतें [च भावि नाशात् अतिभी: अनुवर्तते-] व पुढें त्यांचा नाश होईल असें वाटत असल्यामुळें अतिशय भीति वाटत असते. [श्रोत्रियस्य इदं उभयं न-] श्रोत्रियास त्यांपैकीं कांहीं एक नसतें. [अत: तदानंद: अन्यत: अधिक:-] यास्तव त्याचा आनंद राजाच्या आनंदाहून अधिक असतो. [राज्ञ: गंधर्वानंदे आशा अस्ति विवेकिन: न अस्ति-] शिवाय राजाची गंधर्वानंदा-विषयीं इच्छा असते, पण विवेक्याला ती नसते.

प्रकाश:- राजास असंख्य लढाया, अनंत हत्या, अगणित भोगांचीं साधनें मिळवावीं लागतात. व तीं मिळवितांना अनेक कष्टहि सोसावे लागतात. पुढें त्यांच्या नाशाविषयीं अहोरात्र चिंता बाळगावी लागते. 'कोणी प्रबल शत्रु माझ्या या सुखसाधनांचा अपहार तर करणार नाहीं ना ? ही चिंता राजास जन्मभर सोडीत नाहीं. श्रोत्रियाची स्थिति यापेक्षां कितीतरी उत्तम असते. कारण त्यास पूर्वोक्त चिंता कधीं स्वप्नातहि स्पर्श करीत नाहीं. शिवाय राजांस ऐहिक सर्व सुखें मिळून त्यांच्याविषयीं जरी तो निस्तृष्ण झालेला असला, तरी पारलौकिक सुखाची त्याला इच्छा असतेच. माझ्या सुखापेक्षां गंधर्वांचें सुख अधिकच आहे, यास्तव तें मला कसें मिळेल ? या विवेचनेंत तो अहोरात्र पडलेला असतो. ज्ञानी पुरुषास ही चिंताहि नसते. तस्मात् राजापेक्षां श्रोत्रियाचा आनंद अधिक होय. ॥२६॥२७

-गंधर्वानंद दोन प्रकारचा आहे, असें दाखविण्याकरितां पुढील दोन श्लोकांत गंधर्वांचे भेद सांगतात -

अस्मिन्कल्पे मनुष्य: सन्पुण्यपाकविशेषत: ।
गंधर्वत्वं समापन्नौ मर्त्यगंधर्व उच्यते ॥२८

पूर्वकल्पे कृतात्पुण्यात्कल्पादावेव चेद्भवेत् ।
गंधर्वत्वं तादृशोऽत्र देवगंधर्व उच्यते ॥२९

अन्वयार्थ - [अस्मिन् कल्पे मनुष्य: सन् पुण्यपाकविशेषत: गंधर्वत्वं समापन्न: मर्त्यगंधर्व: उच्यते-] या कल्पामध्यें मनुष्य असून विशेष प्रकारच्या पुण्यपरिपाकामुळें जो गंधर्वत्वास प्राप्त झालेला असतो त्याला मर्त्यगंधर्व म्हणतात [पूर्वकल्पे कृतात् पुण्यात् कल्पादौ एव गंधर्वत्वं भवेत् चेत्-] व पूर्वकल्पांत केलेल्या पुण्यकर्मामुळें कल्पाच्या आरंभींच जर गंधर्वत्वाची प्राप्ति झाली असली [तर्हि तादृश: अत्र देवगंधर्व: उच्यते-] तर तशा प्रकारच्या गंधर्वास शास्त्रांत देवगंधर्व म्हणतात.

प्रकाश:- एकाच कल्पामध्यें पूर्वी मनुष्य असून जो पुढें पुण्यपरिपाकामुळें गंधर्वयोनींत उत्पन्न होतो, तो मर्त्यगंधर्व होय, व पूर्वकल्पांत केलेल्या कर्मामुळें उत्तर कल्पाच्या आरंभीं ज्यास गंधर्वत्व प्राप्त होतें, तो देवगंधर्व होय. ॥२८॥२९॥

-आतां चिरलोक पितरांचा व आजानदेवांचा आनंद दाखविण्याकरितां चिरलोक पितर व आजानदेव कोणते ते सांगतात -

अग्निष्वात्तादयो लोके पितरश्चिरवासिन: ।
कल्पादावेव देवत्वं गता आजानदेवता: ॥३०

अन्वयार्थ - [लोके चिरवासिन: अग्निष्वात्तादय: पितर:-] पितृलोकीं चिरकाल वास करणारे अग्निष्वात्तादिक पितर व [कल्पादौ एव देवत्वं गता: आजानदेवता:-] कल्पाच्या आरंभींच देवत्वाप्रत प्राप्त झालेले आजानदेव होत.

प्रकाश:- अग्निष्वात्त इत्यादि पितर पितृलोकीं दीर्घकाल वास करीत असतात, यास्तव त्यांस चिरलोक पितर म्हणतात. आणि पूर्वकल्पांत केलेल्या पुण्यामुळें जे उत्तर कल्पाच्या आरंभींच देव होतात, त्यांस आजानदेव म्हणतात. ॥३०॥

-आतां कर्मदेव कोणते तें सांगतात -

अस्मिन्कल्पेऽश्वमेधादि कर्म कृत्वा महत्पदम् ।
अवाप्याजानदेवैर्याः पूज्यास्ताः कर्मदेवताः ॥३१

अन्वयार्थ - [अस्मिन् कल्पे अश्वमेधादि कर्म कृत्वा-] या कल्पामध्यें अश्वमेधादि कर्मे करून व [महत्पदं अवाप्य-] मोठ्या पदास प्राप्त होऊन [आजानदेवैः याः पूज्याः-] आजानदेवांस पूज्य झालेल्या देवता असतात [ताः कर्मदेवताः-] त्या कर्मदेवता होत.

प्रकाशः- अश्वमेघ, ज्योतिष्टोम इत्यादि वैदिक यज्ञ व दुसरींहि स्वर्ग देणारीं कर्मे करून, मोठ्या पदाला प्राप्त झालेल्या देवता पूर्वोक्त आजानदेवांस पूज्य होतात; व त्यांस कर्मदेवता म्हणतात. ॥३१॥

यमाग्निमुख्या देवाः स्युर्ज्ञाताविंद्रबृहस्पती ।
प्रजापतिर्विराट् प्रोक्तो ब्रह्मा सूत्रात्मनामकः ॥३२

अन्वयार्थ - [यमाग्निमुख्याः देवाः स्युः-] यम, अग्नि इत्यादि देव होत. [इंद्रबृहस्पती ज्ञातौ-] इंद्र व बृहस्पती हे तर प्रसिद्ध आहेत. [प्रजापतिः विराट् प्रोक्तः-] प्रजापतीसच शास्त्रांत विराट् असें म्हटलें आहे. [च ब्रह्मा सूत्रात्मनामकः अस्ति-] व ब्रह्मदेव सूत्रात्मसंज्ञक आहे.

प्रकाशः- यम, अग्नि, वरुण, वायु, कुबेर, इत्यादि सर्व देव होत. इंद्र हा राजा असून बृहस्पती त्याचा गुरु आहे. विराडात्म्यासच प्रजापति म्हणतात व हिरण्यगर्भास सूत्रात्मा किंवा ब्रह्मा असें नांव दिलेलें आहे. मनुष्यगंधर्वापासून सूत्रात्म्यापर्यंत ज्यांचा निर्देश केलेला आहे त्यांचा आनंद उत्तरोत्तर शतपट अधिक असतो, म्हणजे पूर्वोक्त सार्वभौम राजाच्या आनंदापेक्षां मनुष्यगंधर्वांचा आनंद शतपट अधिक; मनुष्यगंधर्वांच्या आनंदापेक्षां देवगंधर्वांचा आनंद शतपट अधिकः अशा क्रमानें आनंदाची मर्यादा हिरण्यगर्भापर्यंत वाढत गेली आहे. ॥३२॥

- पण या सर्वांच्या आनंदाहून श्रोत्रियाचा आनंद अधिक आहे, असें आतां सांगतात -

सार्वभौमादिसूत्रांता उत्तरोत्तरकामिनः ।
अवाङ्मनसगम्योऽयमात्मानन्दस्ततः परः ॥३३

अन्वयार्थ - [सार्वभौमादिसूत्रांताः उत्तरोत्तरकामिनः सन्ति-] सार्वभौम राजापासून सूत्रात्म्यापर्यंत सर्वहि जीव उत्तरोत्तर अधिक आनंदाची इच्छा करीत असतात. आतां या सर्वांहून अधिक आनंद सांगतात - [यतः अयं आत्मानन्दः अवाङ्मनसगम्यः ततः परः अस्ति-] ज्या अर्थीं हा आत्मानंद वाणी व मन यांचा गोचर-विषय न होणारा आहे त्याअर्थीं त्या सर्वांहून अधिक आहे.

प्रकाशः- राजा मनुष्यगंधर्वांच्या आनंदाची इच्छा करितो; मनुष्वगंधर्व देवगंधर्वांच्या आनंदाची इच्छा करितो व याप्रमाणें सूत्रात्म्यापर्यंत पूर्व पूर्व प्राणी पुढच्या पुढच्या आनंदाची इच्छा करीत असतो. पण हे सर्व आनंद सातिशय आहेत. सातिशय म्हणजे अतिशय युक्तः अतिशय म्हणजे आधिक्य. एकाहून दुसऱ्यानें अधिक असणें म्हणजे त्या एकानें सातिशय होणें होय. या सर्व आनंदाहून आत्मानंद अधिक असतो. यास्तव हे सर्व आनंद सातिशय होत. व आत्मानंदाहून अधिक असा दुसरा एकादा आनंद प्रसिद्ध नसल्यामुळें तो निरतिशय होय. हा आत्मानंद वाणी व मन यांसहि विषय होत नाहीं. म्हणजे याच्या विषयीं कांहीं बोलतां येत नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याच्या विषयीं कांहीं कल्पनाहि करवत नाहीं. तस्मात् तो या सर्व आनंदांहून श्रेष्ठ आहे. ॥३३॥

- आतां हे सर्व आनंद श्रोत्रियामध्यें कसे असतात ते सांगतात -

तैस्तैः काम्येषु सर्वेषु सुखेषु श्रोत्रियो यतः ।
निस्पृहस्तेन सर्वेषामानन्दाः सन्ति तस्य ते ॥३४

अन्वयार्थ - [यतः श्रोत्रियः तैः तैः काम्येषु सर्वेषु सुखेषु निःस्पृहः-] ज्या अर्थीं श्रोत्रिय त्या त्या

जीवांकडून इच्छिल्या जाणाऱ्या सर्व सुखांविषयीं नि:स्पृह असतो, [तेन तस्य ते सर्वेषां आनंदा: सन्ति-] त्या अर्थीं त्याला ते सर्वांचे आनंद प्राप्तच आहेत.

प्रकाश:- ज्याला जी वस्तु प्राप्त झालेली असते तिच्या विषयीं त्याला कधीं इच्छाहि होत नाहीं; असा सर्वत्र अनुभव आहे. त्यावरून:- निष्काम श्रोत्रियास जो आनंद होत असतो त्यामध्यें या पूर्वोक्त सातिशय आनंदांचा अंतर्भाव होत असल्यामुळें त्याला त्यांची इच्छा होत नाहीं - असें अनुमान निघतें. ॥३४॥

- आतां प्रतिपादन केलेल्या अर्थाचा उपसंहार करितात -

सर्वकामाप्तिरेषोक्ता यद्वा साक्षिचिदात्मना ।
स्वदेहवत्सर्वदेहेष्वपि भोगानवेक्षते ॥३५

अन्वयार्थ - [एषा सर्वकामाप्ति: उक्ता-] ही सर्व कामप्राप्ति सांगितली; आतां दुसरा पक्ष सांगतात - [यद्वा साक्षिचिदात्मना स्वदेहवत् सर्वदेहेषु अपि भोगान् अवेक्षते-] अथवा ज्ञानी साक्षिचैतन्यरूपानें आपल्या देहाप्रमाणेंच सर्वदेहांमध्येंहि भोगांस पाहतो. (जसें आपल्या देहांत आनंदाकार बुद्धिसाक्षित्वानें आनन्दित्व पाहतो त्याचप्रमाणें इतरांच्यादि देहांत तो आनंदित्व पाहतो.)

प्रकाश:- या प्रकरणाच्या अठराव्या श्लोकापासून येथपर्यंत आत्मज्ञानी पुरुषास सर्व कामनांची प्राप्ति कशी होते तें सांगितलें. आतां तीच कामाप्ती अन्य प्रकारेंहि होते असें सांगतात. साक्षी चिदात्मा सर्व शरीरांत आहे. अर्थात् आनंदाकार बुद्धीचा साक्षी या नात्यानें या शरीरांत जसा त्याला आनंदीपणा आहे, तसाच तो इतर देहामध्यें असणाऱ्या आत्म्यासहि आहे असें तो जाणतो. म्हणजे. आत्मा सर्वदा आप्तकाम आहे. त्याला प्राप्तव्य किंवा काम्य असें कांहीं नाहीं. ॥३५॥

-'या दृष्टीनें अज्ञालाहि सर्व आनंदाची प्राप्ति आहे !' उत्तर --

अज्ञस्याप्येतदस्त्येव न तु तृप्तिरबोधत: ।
यो वेद सोऽश्नुते सर्वान्कामानित्यब्रवीच्छ्रुति: ॥३६

अन्वयार्थ - [अज्ञस्य अपि एतत् अस्ति एव-] तर मग अज्ञालाहि ही आनंदप्राप्ति आहेच, असें जर म्हणशील तर तें बरोबर आहे. [तु अबोधत: तृप्ति: न अस्ति-] पण अज्ञानामुळें त्याला तृप्ति नाहीं, 'सर्वांतील सर्व बुद्धींचा साक्षी मी आहें' असें ज्ञान नसल्यामुळें त्यांना तृप्ति नसते. याविषयीं तैत्तिरीय श्रुतीचें प्रमाण- ['य: वेद स: सर्वान् कामान् अश्नुते' इति श्रुति: अब्रवीत्-] 'जो गुहेंतील ब्रह्म जाणतो, त्याला सर्व कामसुखें एकदम प्राप्त होतात' असें श्रुतीनें सांगितलें आहे.

प्रकाश:- आत्मा सर्वव्यापी व सर्वांतर्यामी असल्यामुळें तो प्रत्येक शरीरांत असतो हें उघड आहे. त्यामुळें तुमच्या या पूर्वोक्त न्यायानें अगदीं प्राकृत पुरुषासहि आत्म्याच्या आनंदाचा अनुभव यावयास पाहिजे, पण तसें होत नाहीं; असें वाद्याचें म्हणणें आहे. त्यावर सिद्धांती सांगतात:- आत्मा प्राकृत पुरुषाच्या शरीरांतहि असतो हें अगदीं खरें आहे; व तो आत्मकाम आहे, हेंहि कांहीं खोटें नाहीं. परंतु आत्म्याचें हें यथार्थ स्वरूप नसल्यामुळें त्यास तृप्ति नसते. तैत्तिरीय श्रुतीमध्यें 'जो ह्या नित्यानंदरूप आत्म्यास साक्षात् जाणतो, त्यास सर्व कामोपभोग एकाच कालीं प्राप्त होतात' असें सांगितलेलें आहे. ॥३६॥

- आतां तिसरा प्रकार सांगतात -

यद्वा सर्वात्मतां स्वस्य साम्ना गायति सर्वदा ।
अहमन्नं तथान्नादश्चेति साम ह्यधीयते ॥३७

अन्वयार्थ - [यद्वा स्वस्य सर्वात्मता साम्ना सर्वदा गायति-] किंवा आपली सर्वात्मता सामाच्या

द्वारा सदा गातो. [अहं अन्नं तथा च अन्नाद: इति हि साम अधीयते-] 'मी अन्न व तसाच अन्नाद आहें' असें साम श्रुतीनें पठन केलेलें आहे. (म्ह० विषय-विषयी, भोग्य-भोक्ता, आत्मा-अनात्मा सत्-असत् इत्यादि सर्व मीच आहें, अशा अर्थाचें साम तत्त्वज्ञ आनंदानें गातो, असें तैत्तिरीयांत सांगितलें आहे. तै. भा. ३.१०).

प्रकाश:- ज्ञानी पुरुष आत्मज्ञानामुळें तृप्त होऊन व आत्मा सर्वात्मभूत आहे, असें समजून, त्याच्या सर्वात्मतेचें नित्य गायन करीत राहतो. तैत्तिरीय श्रुतीमध्यें आत्मज्ञ गायन कसें करितो तें एका सामसंज्ञक ऋचेनें दाखविलें आहे. त्याचा अर्थ असा- मी अन्न आहें व अन्नादहि आहें. म्हणजे विषय व विषयी, भोग्य व भोक्ता, आत्मा व अनात्मा, सत् व असत् इत्यादि सर्व मीच आहें. ॥३७॥

- असो; आतां या प्रकरणाच्या तिसऱ्या श्लोकापासून येथपर्यंत प्रतिपादन केलेल्या विषयाचा संक्षेपत: निर्देश करितात -

दु:खाभावश्च कामाप्तिरुभे ह्येवं निरूपिते ।
कृतकृत्यत्वदन्यच्च प्राप्तप्राप्यत्वमीक्षताम् ॥३८

अन्वयार्थ - [एवं दु:खाभाव: च कामाप्ति: इति उभे हि निरूपिते-] ह्याप्रमाणें दु:खाभाव व कामाप्ति या उभयतांचें निरूपण केलें. [अन्यत् कृतकृत्यत्वं च प्राप्तप्राप्यत्वं ईक्षताम्-] आतां राहिलेलें कृतकृत्यत्व व प्राप्तप्राप्यत्व पहावें.

प्रकाश:- या प्रकरणाच्या तिसऱ्या श्लोकांत विषयानन्दाचे चार भेद सांगितले होते, त्यापैकीं दोघांचेहि येथवर निरूपण केलें. आतां यापुढें बाकी राहिलेल्या दोन आनंदांचें निरूपण कर्तव्य आहे. ॥३८॥

-पण तें तर पूर्वी सातव्या प्रकरणांतच होऊन गेलें आहे, असें आतां सांगतात -

उभयं तृप्तिदीपे हि सम्यगस्माभिरीरितम् ।
त एवात्रानुसंधेया: श्लोका बुद्धिविशुद्धये ॥३९

अन्वयार्थ - [अस्माभि: उभयं हि तृप्तिदीपे सम्यक् ईरितम्-] आम्हीं त्या दोहोंचेंहि तृप्तिदीपांत उत्तम प्रकारें निरूपण केलें आहे. [बुद्धिविशुद्धये ते एव श्लोका: अत्र अनुसंधेया:-] पण बुद्धि अति निर्मल व्हावी म्हणून त्या श्लोकांचेच येथें अनुसंधान करणें उचित आहे.

प्रकाश:- प्रसंगोपात्त पूर्वींच त्याचें प्रतिपादन झालेलें असल्यामुळें या स्थळींहि तेथील श्लोकांचेंच चिंतन करणें उचित होय. ॥३९॥

- या पुढील अठरा श्लोक कृतकृत्यता व प्राप्तप्राप्यता कशी प्राप्त होते तें दाखवीत आहेत. त्यांचें विस्तृत व्याख्यान होऊन गेलेलें असल्यामुळें, येथें प्रत्येक श्लोकापुढें त्याचें सरळ तात्पर्य देतों -

ऐहिकामुष्मिकव्रातसिद्ध्यै मुक्तेश्च सिद्धये ।
बहुकृत्यं पुरास्याभूत्तत्सर्वमधुना कृतम् ॥४०

तात्पर्य - आत्मसाक्षात्कार होण्यापूर्वीं ऐहिक व पारलौकिक सुखाच्या समूहाची प्राप्ति व्हावी म्हणून व मुक्तीकरितां मला पुष्कळ कर्तव्य होतें. पण आतां आत्मसाक्षात्कार झाल्यामुळें मला कांहीं एक कर्तव्य राहिलें नाहीं. ॥४०॥

तदेतत्कृतकृत्यत्वं प्रतियोगिपुर:सरम् ।
अनुसंदधदेवायमेवं तृप्यति नित्यश: ॥४१

तात्पर्य - ह्या कृतकृत्यपणाचें त्याच्या विरोधी कर्तव्यांसह चिंतन करणारा आत्मज्ञ सर्वदा तृप्त राहतो. ४१

दु:खिनोऽज्ञा: संसरंतु कामं पुत्राद्यपेक्षया ।
परमानंदपूर्णोऽहं संसरामि किमिच्छया ॥४२

तात्पर्य - पुत्रादिकांच्या इच्छेनें अज्ञ दु:खी होऊन खुशाल संसारपरंपरेंत पडोत. मला त्यामध्यें पडावयाचें नाहीं. कारण मी परमानंदानें भरलेला महासागर आहें. तेव्हां मला कशाची इच्छा होणार ? व इच्छाच जर

नाहीं तर माझी प्रवृत्ति तरी कशी होणार ? ४२

अनुतिष्ठन्तु कर्माणि परलोकयियासवः ।
सर्वलोकात्मकः कस्मादनुतिष्ठामि किं कथम् ॥४३

तात्पर्य - ज्यांना स्वर्गादि परलोकीं जावयाचें असेल, ते खुशाल कर्मानुष्ठान करोत. पण मी सर्व लोकमयच असल्यामुळें मला त्याची इच्छा नाहीं व त्यामुळें कर्मानुष्ठाचीहि गरज नाहीं. ४३

व्याचक्षतां ते शास्त्राणि वेदानध्यापय तु वा ।
येऽत्राधिकारिणो मे तु नाधिकारोऽक्रियत्वतः ॥४४

तात्पर्य - ज्यांचा अधिकार असेल त्यांनीं शास्त्रांचें व्याख्यान करावें किंवा वेदांचें अध्ययन करावें. मला त्याची गरज नाहीं, कारण मला त्यांच्या फलाची इच्छा नसल्यामुळें मी अनधिकारीच आहें. ४४

निद्राभिक्षे स्नानशौचे नेच्छामि न करोमि च ।
द्रष्टारश्चेत्कल्पयंति किं मे स्यादन्यकल्पनात् ॥४५

तात्पर्य - तर मग निद्रा, भिक्षा, स्नान, मलोत्सर्ग करणाऱ्या द्वारांची शुद्धि इत्यादि कर्में तुम्हीं कशीं करितां ? म्हणून विचाराल तर मी स्वतः असंग असल्यामुळें तीं करीत नाहींच. आतां माझ्या शरीराकडे पाहून माझे ठिकाणीं जर कोणी प्रेक्षक त्यांची कल्पना करीत असले, तर ते खुशाल करोत. माझी त्यांस ना नाहीं. पण मला कशाचीहि इच्छा नाहीं व मीं कांहीं करीतहि नाहीं. ४५

गुंजापुंजादि दह्येत नान्यारोपितवन्हिना ।
नान्यारोपितसंसारधर्मानेवमहं भजे ॥४६

तात्पर्य - दुसऱ्यांनीं गुंजेच्या ढिगावर अग्नीचा आरोप जरी केला तरी तो ढीग कोणासहि जाळीत नाहीं. तसाच दुसऱ्यांनीं माझ्यावर संसारधर्माचा जरी आरोप केला, तरी त्यामुळें मी संसारी होणार नाहीं. ४६.

शृण्वंत्वज्ञाततत्त्वास्ते जानन्कस्माच्छृणोम्यहम् ।
मन्यंतां संशयापन्ना न मन्येऽहमसंशयः ॥४७

तात्पर्य - ज्यांना तत्त्व काय आहे हें ठाऊक नाहीं, ते खुशाल श्रवण करोत. मला तत्त्व समजलें आहे, व त्यामुळें श्रवणाची गरज नाहीं. तसेंच ज्यांना संशय असेल ते मनन करोत. मला संशयहि नाहीं व मी मननहि करीत नाहीं. ४७

विपर्यस्तो निदिध्यासेत् किं ध्यानमविपर्यये ।
देहात्मत्वविपर्यासं न कदाचिद्भजाम्यहम् ॥४८

तात्पर्य - ज्यांची विपरीत भावना झाली असेल, त्यांनीं निदिध्यासन करावें. मला विपरीत भावनाच नसल्यामुळें त्याची गरज नाहीं. देहास आत्मा समजणें हीच विपरीत भावना होय. पण मी तसें कधींहि समजत नाहीं व त्यामुळें मला ध्यानाचीहि आवश्यकता नाहीं.४८

अहं मनुष्य इत्यादिव्यवहारो विनाप्यमुम् ।
विपर्यासं चिराभ्यस्तवासनातोऽवकल्पते ॥४९

तात्पर्य - तर मग 'मी मनुष्य आहें' असा व्यवहार तरी तुम्ही कसा करूं शकतां ? असें कोणी विचारील तर त्यास आमचें एवढेंच उत्तर आहे कीं, 'मी देह आहें' या विपरीत भावनेवांचूनच, दीर्घकाल अभ्यास झाल्यामुळें, त्या वासनेनें तो होऊं शकतो. ४९

आरब्धकर्मणि क्षीणे व्यवहारो निवर्तते ।
कर्माक्षये त्वसौ नैव शाम्येद्ध्यानसहस्रतः ॥५०

तात्पर्य - 'पण हा तुमचा वासनेमुळें होणारा व्यवहार थांबणार तरी केव्हां ?' म्हणून जर विचारशील, तर त्याचें उत्तर असें-प्रारब्धकर्माचा क्षय झाला असतां हा व्यवहार आपोआप थांबेल, व तें कर्म जोंपर्यंत क्षीण झालेलें नाहीं तोंपर्यंत हजारो वेळां जरी ध्यान केलें, तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. ५०

विरलत्वं व्यवहृतेरिष्ट चेद्ध्यानमस्तु ते ।
अबाधिकां व्यवहृतिं पश्यन्ध्यायाम्यहं कुत: ।।५१

तात्पर्य - ध्यानाच्या योगानें व्यवहार विरल होतो असें जर म्हणत असशील, तर तूं तें ध्यान खुशाल कर. प्रारब्धकर्मप्राप्त व्यवहाराचा बाध होणें शक्यच नाहीं, असें समजत असतांनाहि, मी तें कशाकरितां करूं ! ५१

विक्षेपो नास्ति यस्मान्मे न समाधिस्ततो मम ।
विक्षेपो वा समाधिर्वा मनस: स्याद्विकारिण:।।५२

तात्पर्य - मला कोणत्याहि प्रकारचा विक्षेप नाहीं व त्यामुळें समाधीचीहि गरज नाहीं. विक्षेप व समाधि हे दोन्ही विकारी मनाचे धर्म आहेत. येथें विक्षेप म्हणजे मनाची चंचलता व समाधि म्हणजे मनाची एकाग्रता असें समजावें. ५२

नित्यानुभवरूपस्य को मेऽत्रानुभव: पृथक् ।
कृतं कृत्यं प्रापणीयं प्राप्तमित्येव निश्चय: ।।५३

तात्पर्य - मला जें कांहीं अवश्य कर्तव्य होतें तें सर्व मी केलें आहे, व जें कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें होतें तें प्राप्त झालें आहे. तेव्हां नित्य अनुभवरूप अशा मला आतां दुसरा कोणता अनुभव येणार ! ५३

व्यवहारो लौकिकौ वा शास्त्रीयो वान्यथापि वा।
ममाकर्तुरलेपस्य यथारब्धं प्रवर्तताम् ।।५४

तात्पर्य - अकर्ता व निर्लेप अशा माझा लौकिक, शास्त्रीय किंवा प्रतिषिद्ध व्यवहार प्रारब्धकर्माप्रमाणें खुशाल होऊं दे. ५४

अथ वा कृतकृत्योऽपि लोकानुग्रहकाम्यया ।
शास्त्रीयेणैव मार्गेण वर्तेऽहं का मम क्षति: ।।५५

तात्पर्य - अथवा मी जरी स्वत: कृतकृत्य झालों आहें, तरी मी लोकोपकारार्थ शास्त्रीय मार्गानेंच चालणार ! त्यांत माझी कोणती हानि आहे ! ५५

देवार्चनस्नानशौचभिक्षादौ वर्ततां वपु: ।
तारं जपतु वाक् तद्वत्पठत्वाम्नायमस्तकम् ।।५६

तात्पर्य - हें विनाशी शरीर देवपूजा, स्नान, शौच, भिक्षा इत्यादि कर्मे खुशाल करो; वाणी प्रणवाचा जप करो व उपनिषदांचा पाठहि करो. ५६

विष्णुं ध्यायतु धीर्यद्वा ब्रह्मानंदे विलीयताम् ।
साक्ष्यहं किंचिदप्यत्र न कुर्वे नापि कारये ।।५७

तात्पर्य - बुद्धि विष्णूचें ध्यान करो कीं, ब्रह्मानन्दामध्यें लीन होवो. मी साक्षी आत्मा यांतील कांहीं एक करीत नाहीं; किंवा करवीतहि नाहीं. ५७

कृतकृत्यतया तृप्त: प्राप्तप्राप्यतया पुन: ।
तृप्यन्नेवं स्वमनसा मन्यतेऽसौ निरंतरम् ।।५८

तात्पर्य - हा कृतकृत्यापणामुळें तृप्त झालेला ज्ञानी पुनरपि प्राप्य पदार्थ प्राप्त झाल्यामुळें तृप्त होत्साता आपल्या मनामध्यें सर्वदा पुढील सहा श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें चिंतन करितो. ५८

धन्योहं धन्योहं नित्यं स्वात्मानमंजसा वेद्मि ।
धन्योहं धन्योहं ब्रह्मानंदो विभाति मे स्पष्टम् ।।५९

धन्योहं धन्योहं दु:खं सांसारिकं न वीक्षेऽद्य ।
धन्योहं धन्योहं स्वस्याज्ञानं पलायितं क्वापि ।।६०
धन्योहं धन्योहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।
धन्योहं धन्योहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ।।६१
धन्योहं धन्योहं तृप्तेर्मे कोपमा भवेल्लोके ।
धन्योहं धन्योहं धन्यो धन्य: पुन: पुनर्धन्य: ।।६२
अहो पुण्यमहो पुण्यं फलितं फलितं दृढम् ।
यस्य पुण्यस्य संपत्तेरहो वयमहो वयम् ।।६३
अहो शास्त्रमहो शास्त्रमहो गुरुरहो गुरु: ।
अहो ज्ञानमहो ज्ञानमहो सुखमहो सुखम् ।।६४

तात्पर्य - मी आपल्या आत्म्याला नित्य साक्षात् जाणतों व त्यामुळें मला ब्रह्मानंदाचा स्पष्ट प्रत्यय येत

आहे. खरोखर मी धन्य आहें, माझा जन्म सफल झाला. मला सांसारिक दु:ख मुळींच भासत नाहीं, माझें आत्म्याविषयींचें अज्ञान कोठें पळालें, कांहीं समजत नाहीं. आतां मला कांहीं एक कर्तव्य उरलेलें नाहीं. मला जें कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें होतें तें सर्व प्राप्त झालें आहे. माझ्या या तृप्तीला इहलोकीं उपमाच नाहीं ! खरोखर मी धन्य, धन्य, मी धन्य, धन्य, धन्य, अति धन्य आहें. अहाहा !! कायहो सांगूं ! माझें पुण्य आज फळास आलें. या पुण्याच्या फलानें संपन्न झाल्यामुळें आम्ही कृतकृत्य आहों. वाहवा ! काय तें शास्त्र ? काय त्या गुरूंची योग्यता ! काय तें ज्ञान व कोण तें सुख ! सर्वच कांहीं चमत्कार आहे. तात्पर्य, मी आज धन्य झालो; कृतकृत्य झालों व आनंदाच्या शिखरावर जाऊन बसलों आहें. ५९-६४.

- आतां या विद्यानन्दसंज्ञक चवदाव्या प्रकरणाचा उपसंहार करितात -

ब्रह्मानंदाभिदे ग्रंथे चतुर्थोऽध्याय ईरित: ।
विद्यानंदस्तदुत्पत्तिपर्यंतोऽभ्यास इष्यताम् ।।६५
इति पञ्चदश्यां ब्रह्मानन्दे विद्यानन्द: ।।१४।।

अन्वयार्थ - [ब्रह्मानंदाभिधे ग्रंथे अयं विद्यानन्द: चतुर्थ: अध्याय ईरित:-] ब्रह्मानन्दसंज्ञक ग्रंथांतील हा विद्यानन्दनामक चवथा अध्याय सांगितला. [तदुत्पत्तिपर्यंत: अभ्यास: इष्यताम्-] त्याच्या उत्पत्तीपर्यंत अभ्यास करावा.

प्रकाश:- या प्रकरणांत विद्यानंदाचें वर्णन केलें आहे. हा आनंद प्राप्त होईपर्यंत मुमुक्षूनें पुष्कळ दिवस अहोरात्र व मोठ्या आदरानें अभ्यास करावा. 'ज्ञान जरी झालें तरी देह पडल्यावरच मुक्ति मिळणें शक्य आहे' असें कित्येक समजतात. पण तो समज ऐक्यज्ञानास प्रतिबंध करीत असतो. यास्तव त्याचा या प्रकरणांत निरास केला आहे. ।।६५।।